# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : ६/०८/२०१३ रोजी दुपारी २.३० वाजता
# आयोजित केलेल्या २४९ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : २४९/१५**

**विषय :- पुर्नरचित इमारत क्र.३४६-३५२, एम.ए.रोड व १-३-५ भंडारवाडा क्रॉस लेन, सी.एस.क्र.३९९४, ३९९५, ३९९५/१ व ३९९६, भुलेश्वर विभाग, मुंबई - या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता, उर्वरीत काम पुर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून देणे व उर्वरीत कामासाठी भाववाढ**

----------------------

**ठराव क्र. : ६६०६** **दिनांक : ६/०५/२०१३**

**६/०८/२०१३**

वरील बाब टिपणीस चक्राकार पध्दतीने मंजूरी दिल्यामुळे असा ठराव करण्यात येतो कीं, मुख्य अधिकारी / मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी प्रस्तावित केल्यानुसार पुनर्रचित इमारत क्र.३४६-३५२ एम.ए.रोड व १-३-५ भंडारवाडा क्रॅास लेन सी.एस.क्र.३९९४, ३९९५, ३९५५/१ व ३९९६ भुलेश्वर विभाग मुंबई या कामास

अ) सदर योजनेच्या सुधारित अंदाजपत्रक रु. ३९२ लक्ष रुपयास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

ब) उर्वरित काम ( Balance Work ) पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक ३०/०६/२०१० ते ३१/०३/२०१४ वाढवून देण्यात येत आहे.

क) उर्वरित काम जुन्या ठेकेदाराने सहमती दर्शविल्यानुसार सन २०११-१२ च्या दरसूचीनुसार सममूल्य दराने काम करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

वरील ठराव स्थायी करण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/४

**विषय :- मुंबई जिल्हा फुटबॉल संघटनेस वांद्रे-पश्चिम येथील मैदान क्र.२ मधील सुमारे ११,१२१-० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे, सुशोभिकरण व देखभाल करण्यासाठी दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६०७** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई जिल्हा फुटबॉल संघटनेस वांद्रे पश्चिम येथील मैदान क्र.२ मधील सुमारे ११,१२१.० चौ.मि. क्षेत्रफळाचा भूखंड प्राधिकरणाच्या प्रचलित अटी व शर्तीच्या अधिन राहून रु.१००/- प्रती चौ.मि. प्रमाणे तीन वर्षासाठी फुटबॉल सामने घेण्यासाठी तसेच भूखंडाचे सुशोभिकरण व देखभाल करण्यासाठी परवानगी देणारा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा ठराव क्र. ५८७९, दिनांक २०/०२/२००३ रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर भूखंड हा मोकळा भूखंड नसून कन्व्हेंशनल कॅाम्प्लेक्स म्हणून आरक्षित असल्याने सदर आरक्षण बदलण्याकरिता पत्रव्यवहार सुरु आहे. तरी मुंबई जिल्हा फुटबॉल संघटनेने भरणा केलेली रक्कम परत करणेस तसेच संघटनेस देण्यात आलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/७

**विषय :- प्राधिकरणाच्या सन २०१३-२०१४ च्या कर्माचारी आकृतीबंधामध्ये लेखा संवर्गाची पदसंख्या वाढविणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६०८** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, लेखा अधिकारी वर्ग-१ मध्ये ४ पदे, सहाय्यक लेखाअधिकारी वर्ग-२ मध्ये ३ पदे व लेखापाल संवर्गात २ पदे, लोकलेखा समितीच्या शिफारशीनुसार अंतर्गत लेखा परिक्षण कक्ष स्थापन करणे, निवारा निधीचे लेखे ठेवणे व नियमित काम करणे, वार्षिक लेख्यावरील परिच्छेदांची उत्तरे देणे व प्राधिकरणांचे लेखे विधान मंडळापुढे नियमितपणे सादर करणे या कामासाठी सदर पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

म्हाडातील पदोन्नतीने भरावयाची पदे प्रथम पदोन्नतीसाठी उपलब्ध होणा-या अधिका-यांतून भरुन शिल्लक पदे राहिल्यास ती शासनाकडून समकक्ष अधिकारी प्रतिनियुक्तीवर मागवून भरण्यात यावीत. जर प्रतिनियुक्तीवर अधिकारी आल्यानंतर पदोन्नतीसाठी अधिकारी उपलब्ध झाल्यास त्या त्या प्रमाणे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांच्या सेवा प्रत्यावर्तीत करण्यात याव्यात. सरळसेवा भरती करिता अधिकारी उपलब्ध न झाल्यास त्या जागेवर शासनाकडील समकक्ष अधिकारी प्रतिनियुक्तीवर मागविण्यात यावेत. म्हाडाच्या सरळ सेवा प्रवेश नियमावलीत अटी शिथील करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी व त्या समितीच्या शिफारशी प्राधिकरणासमोर मान्यतेकरिता सादर करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/९

**विषय :- साईट क्र.११४, नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६०९** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, निम्नतम निविदाकार मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. यांचेकडे साईट क्र.११४ नविन चंद्रपूर येथील ६२ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेचे काम ६.५०% अधिक दराने करण्यास तयार आहे काय, याबाबत विचारणा करावी व मे. ईगल इंफ्रा इंडिया लि. या दराने काम करण्यास तयार असल्यास निविदा स्विकृत करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/१०

**विषय :- मंडळाच्या संक्रमण गाळयांचे शासनास संक्रमण सेवा निवासस्थान म्हणून तात्पुरत्या स्वरुपात वितरण करणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६६१०** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, म्हाडातील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे संक्रमण गाळे हे प्रामुख्याने उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहिवाशी यांना तात्पुरत्या स्वरुपाची निवासाची सोय म्हणून असल्याने तसेच गिरणी कामगारांचे गाळे हे केवळ गिरणी कामगारांकरिता असल्याने शासनास सेवानिवासस्थानासाठी उपलब्ध करुन देता येणार नाहीत, यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर बाब शासनास कळविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/११

**विषय :- म्हाडाअंतर्गत मुंबई मंडळाच्या जमिनीवर वसलेल्या अतिक्रमित झोपडपट्टयांचा पुनर्विकास करुन उर्वरीत जमिनीवर विक्रीसाठीच्या सदनिकांचे बांधकाम करण्याबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६११** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, म्हाडा अंतर्गत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमध्ये मोकळया भूखंडावर झोपडपट्टीधारकांनी अतिक्रमण केलेल्या झोपडयांचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदर पुनर्विकास हा बाब टिपणीत दिलेल्या पर्याय-क्र.२ नुसार सदर पर्यायात नमूद केलेल्या अटी व शर्तींस अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, निविदा प्रक्रियेमध्ये right of first refusal ची तरतूद असेल. यामध्ये ज्या प्रकरणी ज्या संस्था / विकासक यांनी झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण / म्हाडा यांचेकडे यापूर्वी परिपूर्ण प्रस्ताव सादर केला आहे व त्या संस्था / विकासक हे उच्चतम निविदाधारक यांचेप्रमाणे म्हाडास बांधकाम क्षेत्रफळ देऊ करतील अशा संस्था / विकासक यांना प्राधान्य देण्यात येईल. तथापि, निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/१२

**विषय :- म्हाडाने बांधलेल्या विविध वसाहतीतील इमारतीचे संरचनात्मक निरीक्षण (Structural Audit) करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६१२** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, म्हाडाने बांधलेल्या अभिहस्तांतरण न झालेल्या ३० वर्षापेक्षा जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट महानगर पालिका नोंदणीकृत Strucutral Engineer यांचेकडून इमारत तपासून घेणेस, व (Strucutral Audit Report ) नुसार इमारत सुस्थितीत आणण्यास, बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र (Strucutral stability certifcate) सादर करणेस, इमारत कमकुवत व असुरक्षित असल्यास पुर्नविकास प्रक्रिया त्वरीत चालू कराव्यात असे कळविणेस मंजुरी देण्यात येत आहे.

१. म्हाडाने बांधलेल्या अभिहस्तांतरीत झालेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट त्या त्या सोसायटयांनी करण्यास कळविणे.
२. ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या व अभिहस्तांतरण न झालेल्या म्हाडा इमारतींचे बृहन्मुंबई महानगर पालिकेने नेमलेल्या पॅनेलमधील Strucutral Engineer कडून ऑडिट करुन घेण्यात यावे.
३. ३० वर्षापेक्षा कमी आयुर्मान असणा-या इमारतींबाबतVisual Inspection अनुसार अंदाजपत्रक ( Estimate ) करुन जेथे गरज असेल तेथे मा.उपाध्यक्ष / प्रा. यांची मान्यता घेऊन कार्यवाही करावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/१४

**विषय :- प्राधिकरणाने वाटप केलेले गाळे भाडयाने देण्यास गाळेधारकास परवानंगी देणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६१३ दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं,

लाभार्थ्यांस त्याचा गाळा Leave & Licence या तत्वानुसार देण्यासाठीचा मसुदा विधी सल्लागार / प्रा. यांनी तयार करुन त्यास मान्यता घेऊन त्यास शासनाच्या मान्यतेस पाठविण्यात यावा व त्या मसुद्यातील अटी शर्ती नुसार म्हाडाचा गाळा भाडयाने देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

१. तसेच आता वितरित करण्यात येणा-या घरांचे Allotment Letter मध्ये तसा Clause टाकण्यात यावा.

२. मात्र गाळा विक्रीचे ५ वर्षांपर्यंतचे सध्याचे बंधन हे कायम राहील.

त्या अनुषंगाने शासनास म्हाड अधिनियमात योग्य ती तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

# बाब क्रमांक : २४९/१६

**विषय :- धारावी पुनर्विकास प्रकल्प यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास नियोजन प्रस्तावास वगळलेल्या भागापैकी म्हाडा संक्रमण शिबीराच्या १.९१ हेक्टर जागेसह म्हाडाच्या एकूण ७.१० हेक्टर जागेचा समावेश धारावी पुनर्विकास योजनेमध्ये करणेसाठी प्राधिकरणाची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६१४** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, धारावी येथील सेक्टर-५ च्या पुनर्विकासासाठी मे.पी.के. दास ॲन्ड असोसिएटस यांच्याकडून तयार करण्यात आलेला प्रारुप विकास नियंत्रण प्रस्ताव नकाशे अंतिम करण्यात आलेले आहे व सदर प्रारुप विकास नियोजन नकाशे धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडे दि. ०६/०४/२०१३ रोजी सादर करण्यात आले आहेत. सदर प्रारुप विकास नियोजन नकाशामध्ये म्हाडा संक्रमण शिबीराच्या १.९१ हेक्टर जागेसह म्हाडाच्या एकूण ७.१० हेक्टर जागेचा पुनर्विकास करणेचे प्रस्तावित केलेले आहे. परंतु धारावी पुनर्विकास प्रकल्प यांनी प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास नियोजन प्रस्तावात म्हाडा संक्रमण शिबीराच्या १.९१ हेक्टर जागेचा समावेश वगळलेल्या भागामध्ये आहे. त्यामुळे म्हाडाने धा.पु.प्र.कडे सादर केलेल्या नकाशाप्रमाणे म्हाडा संक्रमण शिबीराच्या १.९१ हेक्टर जागेसह म्हाडाच्या एकूण ७.१० हेक्टर जागेचा समावेश धारावी पुनर्विकास योजनेमध्ये करणेबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरण कार्योत्तर मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/१८

**विषय :- अभिन्यासातील प्रोराटा क्षेत्राचे ७५% च.क्षे.नि. चे अग्रिम वितरण करण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६६१५** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, जे अभिन्यास मनपाकडे मंजूरीस्तव सादर केलेले आहे त्यांनाच अभिन्यासामधील तात्पुरते प्रोराटा वितरण मुंबई मनपाच्या वि.नि.नि. व MRTP ॲक्ट मधील तरतुदींच्या अधीन राहून म्हाडाने

१. मूळ २.५ च.क्षे.नि. च्या नाहरकत प्रमाणपत्रासोबत अभिन्यासातील ७५% प्रोराटा वितरण ( Provisional ) करणेस मंजूरी देत आहे.

२. उर्वरीत २५% प्रोराटा मधून महापालिकेच्या तरतूदीनुसार १०% मनपा पी.आर कार्डइनवर्डस नसल्याने राखीव ठेवणेस मंजूरी देत आहे.

३. १०% मा.उपाध्यक्ष/प्रा यांच्या आरक्षणात अबेयन्स एरिया (राखीव कोटा) म्हणून राखीव ठेवण्याचे धोरण आहे, तेसुध्दा या २५% क्षेत्रातून राखीव ठेवणेस मंजूरी देत आहे.

४. उर्वरीत ५% आकडेमोडीमध्ये तफावत असल्यास यामधून भागविण्यास मंजूरी देत आहे.

उपरोक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगर पालिकेने मंजूरी नाकारल्यास / अथवा मोठया प्रमाणात सुधारणा सुचविल्यास, त्या अनुषंगाने तात्पुरते वितरण रद्द करण्याचे वा त्यामध्ये सुधारणा करण्याबाबतचे अधिकार मा.उपाध्यक्ष/प्रा. यांना प्रदान करण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/१९

**विषय :- हिंदुस्थान अँटी बायोटिक्स लिमिटेड (भारत सरकारचा सार्वजनिक उपक्रम) या कंपनीची पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पिंपरी वाघिरे, पुणे-१८ स.क्र.१०४, १०५ व १०६ येथील जमिनीपैकी भूखंड क्र. पी-८ क्षेत्र १३४३९.८१ चौ.मी. व पी-९ क्षेत्र ११५८६.०८ चौ.मी. एकूण २५०२५.८९ चौ.मी. जमीन खुल्या व स्पर्धात्मक निविदेव्दारे विकत घेणेबाबत.**

-----------------------

**ठराव क्रमांक : ६६१६** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं,

१. हिंदुस्थान ॲन्टी बायोटिक्स लि. पिंपरी पुणे या कंपनीची स.क्र.१०४, १०५ व १०६ पिंपरी वाघिरे येथील जमिनी पैकी भूखंड क्र. पी-८ क्षेत्र १३४३९.८१ चौ.मी.व पी-९ क्षेत्र ११५८६.०८ चौ.मी.एकूण २५०२५.८९ चौ.मी. जमीन खुल्या व स्पर्धात्मक निविदेद्वारे विकत घेणेबाबत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने निविदेत भरलेला रु. ४४,४०१/- प्रति चौ.मी. या दरास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या दराने पी-८ या भूखंडासाठी रु. ५९,६७,४१,००४/- व पी-९ भूखंडासाठी रु. ५१,४४,३३,५३८/- असे एकूण रु. १११,११,७४,५४२/- ( रु.एकशे अकरा कोटी अकरा लाख चौ-यात्तर हजार पाचशे बेचाळीस फक्त ) एवढी रक्कम तसेच पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या नियमानुसार जमिनीमधून वाहणा-या नाल्याच्या ट्रेनिंगचे, अंतर्गत रस्ते विकासाचे व उच्च दाब विद्युत वाहिती हलविण्यासाठी होणारा अंदाजे रु. १.५० कोटी एवढा खर्च सदर कंपनीकडे त्यांच्या मागणीनुसार भरण्यास एकमताने कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर ठिकाणी परवडणा-या घरांची गृहनिर्माण योजना राबविणेकामी आवश्यक असल्यास प्रचलित विक्री किंमत धोरणामध्ये म्हाडाचे कोणत्याहि प्रकारे नुकसान न करता आवश्यक ते बदल करुन या प्रकल्पापुरती सुधारित विक्री किंमती बाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबतचे सर्व अधिकार मा.उपाध्यक्ष / प्रा. यांना देण्यात येत आहे, यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. हिंदुस्थान ॲन्टी बायोटिक्स लि. कंपनीबरोबर करावयाच्या विक्रीखतावर स्वाक्षरी करण्यास व जमिनीचा रितसर ताबा घेण्यास मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे यांना अधिकार देण्यात येत आहे, यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/२१

**विषय :- मंडळाच्या संक्रमण शिबीरात ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून राहत असलेल्या भाडेकरु/रहिवाशांचा बृहतसूची समावेश करण्यासाठी प्राधिकरणाने घेतलेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६१७** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने ठराव क्र. ६४३३, दिनांक ७/०८/२००९ अन्वये घेतलेला निर्णय रद्द करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच या ठरावाच्या आधारे आतापर्यंत ज्यांना बृहतसूचीवर घेण्यात आले असेल तर ते रद्द करण्यात यावे तसेच कोणत्याही घुसखोरांस पात्र अथवा नियमित करण्यात येऊ नये.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/२२

**विषय :-** **पूणे मंडळाअंतर्गत ताथवडे, ता.मुळशी येथील योजनेखाली मा.उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने पुणे मंडळाच्या पॅनलवरील वर्ग-१ चे नामांकित वास्तुशास्त्रज्ञ नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६१८** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, पिंपरी चिंचवड महानगर पालिका हद्दित ताथवडे, ता.मुळशी जिल्हा पुणे येथे ५७६००.०० चौ.मी.जमीनीवर विनाविलंब प्रकल्प राबविण्याकरिता पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील पॅनेलवरील वर्ग-१ चे नामांकित वास्तुशास्त्रज्ञ श्री.लक्ष्मण थिटे यांना नेमण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४९/२५**

**विषय :- मे.आर.एस.डी.ॲण्ड असोसिएटस्, सनदी लेखापाल, मुंबई यांची "व्हॅट ऑडिटर" म्हणून सन २०१२-१३ करिता नियुक्ती करणेबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६१९** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत सर्व मंडळांच्या लेख्याचे महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००५ अन्वये लेखापरीक्षण करुन व्हॅट ऑडिट रिपोर्ट शासनास सादर करण्याकरिता मे.आर.एस.डी.ॲण्ड असोशिएटस यांची सन २०१२-१३ करिता व्हॅट ऑडिटर म्हणून नियुक्ती करण्यास व सदर कामाचा मोबदला म्हणून रु. २,८२,१५०/- एवढी फी सदर करारात त्यांचे कालावधीतील " ऑडिट रिपोर्ट क्लीअर " होईपर्यंत एकूण फीच्या १० टक्के एवढी रक्कम अदा करण्याचे राखून ठेवण्याचे अटीवर देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/२६

**विषय :- मे.ए.व्ही.शाह आणि कंपनी, सनदी लेखापाल,**
**यांचे नेमणूकीचे नुतनीकरणाबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२०** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मे.ए.व्ही.शाह आणि कंपनी सनदी लेखापाल यांची महाराष्ट्र मुल्यवर्धित कर, सेवा कर याबाबत सल्ला देणे, व्हॅटचे अंतर्गत लेखापरिक्षण करणे, तत्संबंधीची विवरणपत्रे वेळोवेळी विहीत कालावधीत त्या त्या शासकीय कार्यालयास सादर करणे तसेच जर अपील केले असल्यास प्राधिकरणाची बाजू मांडणे इत्यादि कामांच्या सन २०१३-१४ करिता नेमणुकीच्या नुतणीकरणास प्रतिमहा रुपये १,००,०००/- ( रु.एक लाख मात्र ) इतक्या मोबदल्यावर नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/२७

**विषय :- मे.के. एस. संघवी, सनदी लेखापाल (आयकर सल्लागार), यांच्या नियुक्तीचे नुतनीकरण.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२१** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मे.के.एस.संघवी आणि कंपनी सनदी लेखापाल ( आयकर सल्लागार ) यांची म्हाडाविरुध्द आयकर संबंधाने आयकर आयुक्त, आयकर अपिलीय प्राधिकरण तसेच मुंबई उच्च न्यायालय यांचेसमोर विविध प्रकरणे सुनावणीस असल्याने तसेच आयकर विषयक कामाकरिता इत्यादि सन २०१३-१४ मधील कामांकरिता नेमणुकीच्या नुतणीकरणास प्रतिमहा रुपये १,९०,०००/- ( रु.एक लाख नव्वद हजार मात्र ) सेवाकर वगळून इतक्या मोबदल्यावर नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/३१

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक लेखा प्राधिकरणाने स्विकृत करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२२** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा वार्षिक लेखा स्विकृत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

## बाब क्रमांक : २४९/३२

**विषय :- सुराबर्डी येथे ४२ मध्यम उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या प्राप्त झालेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२३** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सुरावर्डी येथील स.क्र.४६ मधील २.७७६६ हेक्टर जमिनीवर ४२ मध्यम उत्पन्न गट गाळयांच्या योजनेच्या मे.विघ्नहर्ता कन्स्ट्रक्शन यांच्या निम्नतम निविदा रक्कम रुपये ४,१८,८८,२७८/- या रकमेवर २.८० टक्के अधिक म्हणजेच रुपये ४,३०,६१,१४९.७८ ( चार कोटी तीस लाख एकसष्ट हजार एकशे एकोणपन्नास व अठ्ठयाहत्तर पैसे फक्त ) या रकमेच्या निविदा स्विकारण्याच्या मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २४९/३५

**विषय :- सरळसेवेने भरावयाच्या वाहन चालक (वर्ग-३) या पदाकरीता असलेली अनुभव अर्हता शिथील करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६२४** **दिनांक : ६/०८/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील महिला आरक्षाणांतर्गत राखीव असलेल्या एका पदावर गुणवत्ता यादीतील एकमेव महिला उमेदवार श्रीमती ममता पाटील यांना लेखी परिक्षेतील मिळालेले गुण आणि वाहन चालन परिक्षेत मिळालेले गुण या बाबी लक्षात घेऊन अनुभवाची अर्हता १ वर्ष कमी करणेबाबत निवड समितीने केलेल्या शिफारशीस प्राधिकरण मान्यता देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.